मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

( ठाणे जिल्हा वाचनालय ) वाचनालय / संदर्भ / नौपाडा

प्रत - ८ सन् - १८७०

ले: जगद्गुरु शंकराचार्यस्व

विधवा विवाहाच्या अशास्त्रतेचे निर्णयपत्र


९

मे

धर्म २

स्वकप्रत
[illegible]

श्री.

# विधवा विवाहाच्या अशास्त्रते विषयीं निर्णयपत्र.

हें पुस्तक

श्रीजगद्गुरु शंकराचार्यस्वामी

मठ करवीर व संकेश्वर

यांणीं

वे. शा. संपन्न रा. रा. नारायणाचार्य गजेंद्रगडकर

व

विष्णु परशुराम पंडित

या उभयतांच्या वादा अंतीं

केलें तें

धर्माभिमानी सच्छिष्यांस कळण्या करितां

आज्ञेवरून

पुणें येथें

रावजी श्रीधर गोंधळेकर याणीं आपले जगद्धितेच्छु छाप-

छापून प्रसिद्ध केलें

मिति चैत्र वद्य २ रविवार शाके १७९२

ता. १७ एप्रेल सन १८७०

किंमत २ आणे.

# श्रीशंकर

सं-८७९६०

## विधवा विवाहाच्या अशास्त्रते विषयीं निर्णयपत्र.

श्रीमत्परमहंसपारव्राजकाचार्यवर्यश्रीऋष्यशृंगपुर षट्दर्शनसंस्थापकश्रीकमलानिकेत करवीर सिंहासनेश्वरश्रीमच्छंकराचार्यान्वयसंजाताभिनवश्रीविद्या शंकर भारती करकंजोद्भव श्री विद्यानरसिंह भारती स्वामी याणीं शके १७९२ प्रमोदनाम संवत्सरे चैत्र शुक्ल ९ रविवारीं शहर पुणे मुक्कामीं सारांश केला ऐसा जे ब्राह्मण ज्ञातींत विधवा विवाह मुंबई शहरांत व त्या नजिक जाहले त्याजविषयीं वैदिक व शास्त्री व सरदार गृहस्थ मंडळीची सभा शहर पुणें येथें होऊन निर्णय जाहला तोः—

विष्णु परशराम पंडित सातारकर याणीं विधवा विवाह करण्यास शास्त्राधार आहे ह्मणून वर्तमानपत्रद्वारें प्रसिद्धि केली त्याजवरून मुंबई येथें हिंदुधर्मव्यवस्थापक मंडळीची सभा स्थापन होऊन त्याणीं विष्णुपरशराम यांस शास्त्र प्रतिपादन करण्यास येण्या विषयीं वारंवार कळविलें असतां प्रथम न येऊन विधवा विवाह होण्याचे पूर्वीं दोन दिवस सभेंत ये-

न रीती प्रमाणें वादविवाद करण्यास राजी न होतां आह्मांस करणें तें आह्मी करितों ह्मणून बोलून शके १७९१ ज्येष्ठ शुद्ध ६ रोजीं रामचंद्र विष्णु बापट सातघरकर प्रांत कुलाबा जिल्हा कोंकण यांचे बंधूची विधवा लक्ष्मी उर्फ वेणू उमर वर्षे अजमासें २० इचा विवाह पांडुरंग विनायक करमरकर राहणार मौजे शिरगांव वाडा आडी तालुके रत्नागिरी याजबरोबर शहर मुंबई येथें करविला, त्या विधवा विवाहास पुढारी वगैरे मंडळींचीं नांवें इंदुप्रकाश वर्तमान पत्रांत प्रसिद्ध केलीं तीं :—

१ विष्णु परशुराम पंडित.
२ गोपाळराव हरी देशमुख.
३ विष्णु मोरेश्वर भिडे.
४ श्रीकृष्णशास्त्री तळेकर.
५ विष्णु परशुराम रानडे.
६ माहादेव गोविंद रानडे.
७ जनार्दन सखाराम गाडगीळ.
८ पांडुरंग विनायक करमर.
९ वेणु विधवा.
१० वामनराव परांजपे.
११ नारायणराव परांजपे.

येणें प्रमाणें असामींस मुंबई येथील हिंदुधर्मव्यवस्थापक सभेनें बहिष्कृत करून काशी, प्रयाग, ग्वाल्हेर, नागपूर, इंदुर, सोलापूर, धुळें, मालेगांव, कायगांवटोंकें, पैठण, नाशिक, त्र्यंबक, नगर, पुणें, वांई, सातारा, कऱ्हाड, करवीर, धारवाड, बेळगांव, मिरज, सांगली, तासगांव, रत्नागिरी, राजापूर, अल्हिबाग, बडोदें, अमदाबाद, भडोच, सुरत, इत्यादि ठिकाणीं बहिष्कारपत्रें रवाना करून सदर्हू मजकुरा बद्दल विनंति पत्र संस्थानीं पाठविलें त्याजवरून सदर्हू बहिष्कार संस्थानांतून मान्य होऊन त्या प्रमाणें निग्रह ठेवण्या विषयीं आज्ञापत्रें ठिकठिकाणीं पाठविण्यांत आलीं त्या अन्वयें सभा होऊन निग्रह केल्याविषयीं विनंति पत्रें संस्थानीं आलीं व मुंबईस हीं संमतीपत्रें जागोजागचीं गेलीं या प्रमाणें बंदोबस्त जाहला.

नंतर विष्णुपरशुराम पंडित हे पुणे मुक्कामीं येऊन

आह्मीं शास्त्रार्थ करण्यास तयार आहों याजकरितां कोणास वाद करण्याचें सामर्थ्य असल्यास पुनर्विवाह अशास्त्र प्रतिपादन करण्यास यावें; व कोणी बोलाविल्यास मी येण्यास तयार आहें, वगैरे मजकुराचीं पत्रें वारंवार प्रसिद्ध केल्या वरून सातारा, पुणें, ग्वाल्हेर, बडोदें, कऱ्हाड, वगैरे ठिकाणचे पंडितानीं वादास हजर होण्यास नोटिसा दिल्या; परंतु वादास कोठेंही हजर जाहले नाहींत. पुण्यास एक वेळा हजर होऊन राजश्री विनायक गंगाधर ऊर्फ आबा साहेब शास्त्री पटवर्धन यांचे विद्यमानें राजश्री विठ्ठल माहादेव ऊर्फ विठोबा अण्णा दप्तरदार कऱ्हाडकर यांशीं शास्त्रार्थाचा वाद करण्याचें काम सुरू असतां अनेक तऱ्हेचे तंटे उपस्थित करून वाद न करितां मुंबईस निघोन गेले.

सदर्हू प्रमाणें अनेक प्रकारचे मजकूर समजल्या वरून धर्म विचार सर्व विद्वज्जन जमवून करावा, असें अंतःकरणीं आणून क्षेत्रोक्षेत्रींचे पंडित व राजधानींचे थोर थोर सरदार मंडळीस गेले फाल्गुन मासीं संस्थान देवतेची स्वारी पुणे मुक्कामीं येणार त्या प्रमाणें येण्या विषयीं पत्रें गेल्या वरून सरदार लोकांकडून व क्षेत्रोक्षेत्रांतील विद्वज्जन व सरदार लोक जमा जाहले. व संस्थान देवतेची स्वारी ही शके १७९१ फाल्गुन शुद्ध ४ रविवारीं पुणे शहरांत आली, आणि विष्णुपरशराम पंडित यांस फाल्गुन शुद्ध १५ तागाईत वद्य ५ शाके मजकुरचे आंत वादास पुणे मुक्कामीं हजर होण्या विषयीं संस्थानाकडून नोटीस गेली. नंतर विधवा विवाहोत्तेजक मंडळी पैकीं विष्णु परशराम पंडित, गोपाळराव हरी देशमुख, माधवराव गोविंद रानडे, जनार्दन सखाराम गाडगीळ, व रामकृष्ण गोपाळ भांडारकर वगैरे मंडळी हजीर जाहली आणि वाद न होण्या विषयीं अनेक तऱ्हा केल्या, व नडी दर्शविल्या तितक्याही कबूल करून वादास हजर होण्याचा व उभय पक्षीं पंच व सरपंच यांचा ठराव राजश्री-

चिमणाजी रघुनाथ ऊर्फ नाना साहेब पंत सचीव, गोपाळराव हरी देशमुख यांचे विद्यमानें झाहला तो:-

यादी - पुनर्विवाह संबंधीं उभय पक्षकारानीं वाद करणें त्याचीं कलमें:- उभयपक्षांचे संमतानें श्री जगद्गुरूंचे सन्निध ठरलीं त्यांचा तपशील:-

१. सभेमध्यें व्यवस्था असावी. गडबड होऊं नये. सभेच्या व्यवस्थापकानीं बंदोबस्त ठेवावा.

२. सभेंत येणारे लोक निमंत्रित असावे. उगीच कोणास येऊं देऊं नये.

३. पंचानीं आप आपले पक्षकारांचे संमतीनें एकेक वादविवाद करणारा नेमावा. त्या मनुष्यास योग्य हरकत आल्यास त्याणीं दुसरा मनुष्य नेमावा.

४. पंचांची नांवनिशींची यादी व वाद विवाद करणारे यांचीं नांवें उभय पक्षकारानीं एकमेकांस उदयीक द्यावीं.

५. वादविवाद होणें तो संस्कृत किंवा मराठींत प्राकृत व्हावा. संस्कृतांत केला असतां त्याचें प्राकृत त्या खालीं लिहून वाद करणारानीं आपली सही करून द्यावी. व त्याची एकेक प्रत दरएक पक्षकाराकडे रहावी.

६. प्रत्येक पक्षांतील वादविवाद करणारा नेमला असेल त्याणें प्रश्नोत्तरांवर सही करावी.

७. कारण परत्वें वादविवादा संबंधीं विषयाचा विचार करण्यास मुदत पाहिजे असल्यास तक्रारीचा विचार करून सर पंच सांगतील त्या प्रमाणें मान्य असावें.

८ वादविवाद संपल्यावर उभय पक्षकारांचे पंचानीं वादासंबंधीं लेखांचा विचार करून आप आपले अभिप्राय कारणा सह वेगळे वेगळे लिहून त्याजवर सह्या करून सरपंचांकडे द्यावे. पंचांचा एकच अभिप्राय असेल तेव्हां एक ठिकाणीं लिहून सह्या कराव्या.

९. उभय पक्षकारांच्या तर्फे पांच पांच पंच ब्राह्मण नेमावे. त्या पंचांत जिकडे ज्यास्त मतें पडतील तो वादाचा निर्णय ठरला असें जाणावें. जर समसमान पंचांचीं मतें पडतील तर वे. शा. संपन्न रा. रा. गोपाळाचार्य कऱ्हाडकर सरपंच याणीं सयुक्तिक व शास्त्राधार पूर्वक आपला अभिप्राय त्याहावा. तो अभिप्राय वादाचा निर्णय होईल.

येणें प्रमाणें वादाचीं कलमें ठरलीं असत मिति फाल्गुन वद्य ७ शके १७९१.

विष्णु परशराम शास्त्री पंडित

सदर्हू यादीवर विष्णुशास्त्री पंडित याणीं सही केल्याचें ते समक्ष असून कबूल केलें आहे ता. २४ मार्च १८७० इसवी.

रुजु (पंत सचीव याची.)

गोपाळराव हरी देशमुख.
नारायणाचार्य गजेंद्रगडकर.

वे. शा. संपन्न रा. रा. नारायणाचार्य याणीं आपली सही आमचे समक्ष केली आहे. मिति फाल्गुन वद्य ११ शके १७९१.

रामचंद्र गणेश नातु (आपासाहेबनातु)

सदर्हू प्रमाणें ठरल्या नंतर उभय पक्षांनीं पंच व सरपंच नेमून घेतले ते:—

| पुनर्विवाहोत्तेजक पक्षाकडील पंच. | | पुनर्विवाह निषेधक पक्षाकडील पंच. | |
|---|---|---|---|
| १ | कृष्णाशास्त्री चिपळोणकर. | १ | दिनकरशास्त्री रखांबेटे इंदु. |
| २ | व्यंकटशास्त्री माटे. | २ | गणेश शास्त्री कोल्हटकर इंदुरकर. |
| ३ | रावजी शास्त्री आगाशे. | | |
| ४ | रघुनाथ शास्त्री शांडे. | ३ | भिकुशास्त्री गोडबोले वांई. |

५ केशवशास्त्री गाडगीळ.

४ आपाशास्त्री खाडिलकर मुंबईकर.

५ भिकाचार्य ऐनापुरे वांईकर.

वादकरणार.

१. विष्णु परशराम शास्त्री पंडित.

सभेचे व्यवस्थापक.

१. रामचंद्र माहादेव हडीकर.

२ रावजी रामचंद्र साठे.

वादकरणार.

१ नारायणाचार्य गजेंद्रगडकर.

सभेचे व्यवस्थापक.

१ विष्णु रामचंद्र कारभारी निसबत श्री.

२ विष्णु रामजी रानडे.

विष्णुपरमशास्त्री यांचीसही.

नारायणाचार्य गजेंद्रगडकर यांची सही.

उभय पक्षांच्या संमतीनें नेमलेले सरपंच वे. शा. संपन्न रा. रा. गोपाळाचार्य कराडकर

वाद सुरू होण्या पूर्वी उत्तेजक पक्षाकडील पंच व साक्ष करणारे त्यांस या वादांत आपण पंच जाहल्यानें व साक्ष केल्यानें कदाचित् आपण बहिष्कारास पात्र होऊं अशी शंका उत्पन्न जाहल्या वरून विष्णुपरशराम शास्त्री पंडित याणीं अभय मिळावें ह्मणून विनंति पत्र पाठविलें त्यावरून पुनर्विवाह करणारे व त्यांचे सांसर्गिक वगैरे यांजवर पूर्वींच बहिष्कार ठेविला आहे. त्या शिवाय हल्लीं पुनर्विवाहाचे वादांत उत्तेजक पक्षाकडे पंच जाहल्या मुळें किंवा साक्ष केल्या मुळें त्या मंडळी वर नवीन दोष ठेविला जाणार नाहीं असें अभय वचन देण्यांत आलें.

पुनर्विवाहो त्तेजक पक्षाकडील पंचांचे यादींत रामकृष्ण गोपाळ भांडारकर व कृष्णशास्त्री चिपळोणकर यांचीं नांवें लिहून दिलीं. परंतु भांडारकर हे शेणवई असल्यामुळें घ

चिपळोणकर हे साहेब लोकांचे घरीं अभक्ष भक्षणाच्या आरोपा बद्दल बहिष्कृत आहेत यास्तव त्या दोघांसही पंचांत घेण्याचें निषेध पक्षानें नाकबूल केलें. नंतर भांडारकर यांचे बद्दल केशव शास्त्री गाडगीळ यांस उत्तेजक पक्षानें नेमून दिलें. व कृष्णाशास्त्री चिपळूणकर यांहीं आपले वरील दोषां बद्दल सक्षौर द्वादशाब्द प्रायश्चित्त ब्रह्मदंडसहित फाल्गुन वद्य ११ रोजीं घेतलें. नंतर त्यांस पंचांत बसण्याचें निषेधक पक्षानें मान्य केलें त्या प्रमाणें उभय पक्षांकडील पंच व सरपंच व शिवाय विद्वज्जन मंडळी व सरदार मंडळी व ग्रहस्थ मंडळी संस्थान देवते सन्निध शहर पुणें पेठ कसबा येथें सदाशिव माधवराव दीक्षित पटवर्धन यांचे वाड्यांत फाल्गुन वद्य ११ शके १७९१ शुक्लनाम संवत्सरे रविवासरे विक्रम संवत् १९२६ रोजीं वादास प्रारंभ जाहला तो वाद नऊ दिवस चालून चैत्र शुद्ध ३ सोमवार शके १७९२ प्रमोद नाम संवत्सरास समाप्त जाहला.

सभेंत वाद सुरू होण्याचे पूर्वीं उभय पक्षांकडील पंच व सर पंच यांजला कळविण्यांत आलें कीं, जो वाद ऐकण्यांत येईल त्या विषयीं सत्य स्मरून खरा अभिप्राय शास्त्रा प्रमाणें द्यावा. या प्रमाणें कोणी न वर्तल्यास त्यास सर्व दोष लागतील.

वादाच्या आरंभीं निषेधक पक्षाचे वाद करणारे नारायणाचार्य गजेंद्रगडकर यांनीं, विष्णुशास्त्री पंडित उत्तेजक पक्षाचे वाद करणारे, यांस कलियुगांत पुनर्विवाह अशास्त्र असतां व रूढी नसतां गेले ज्येष्ठमासीं विधवा विवाह केलात त्यास आधार काय ह्मणून प्रश्न केला. त्याजवर विष्णुशास्त्री यांनीं उत्तर दिलें त्यांतील अभिप्राय :—

कलियुगांत ब्राह्मणादिक वर्णत्रयांची विधवा स्त्री लहान वयाची अगर प्रौढ ह्मणजे प्रसूत जाहली तरी तिचा पुनर्विवाह करावा हें सशास्त्र आहे यास प्रमाण मुख्य पाराशर स्मृति :—

नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबे च पतिते पतौ ॥ पंचस्वापत्सु नारीणां पतिरन्यो विधीयते ॥१॥

या स्मृतीचा त्यांच्या मतें अर्थ नष्ट ह्मणजे देशांतरास जाऊन; त्याचा शोध नाहीं, मृत ह्मणजे मरण पावला, प्रव्रजित् ह्मणजे संन्यासी जाहला, क्लीब ह्मणजे नपुंसक, पतित ह्मणजे भ्रष्ट जाहला इतक्यां पैकीं कोणती ही आपत्ति प्राप्त जाहली असतां दुसरा नवरा करावा. कलियुगांत पाराशर स्मृति प्रबल ह्मणजे अन्य स्मृतीशीं व पराशर स्मृतीशीं विरोध येईल तर इतर स्मृतीचाच बाध अथवा गौण अर्थ करावा. नष्टे मृते अशीच नारद स्मृति, व मनुस्मृतीही आहे. कलियुगांत पुनर्विवाह निषेध वचनें सामान्य आहेत त्याचा विशेष विषयक पराशर स्मृतीनें बाध करावा वगैरे:—

सदरहू पक्षाचें खंडण करणार नारायणाचार्य यांचें ह्मणणें कलियुगांत ब्राम्हणादि वर्णत्रयांत विधवा विवाह करणें धर्मशास्त्रास विरुद्ध आहे. कारण द्विजानीं, विधवा विवाह अज्ञानानें केला तर तिचा परित्याग करून प्रायश्चित्त करावें. व तें प्रायश्चित्त मोठें आहे. तिचे पासून उत्पन्न जाहलेली संतति रंडगोलक होते यास प्रमाण, आश्वलायन स्मृति.

अज्ञानतोद्विजो यस्तु विधवामुद्वहेद्यदि ॥ परित्यज्य विदित्वेनां प्रायश्चित्तं समाचरेत् ॥ अब्दमेकं व्रतं कृत्वा अवकीर्णिव्रतं चरेत् ॥ पुत्रश्चेज्जायते तस्यां रंडगोलक उच्यते इति ॥ ३ ॥

आणखीं पुनर्विवाहित स्त्री ज्यांची भार्या त्यांस यावत् जन्म सर्व कार्यांत आशौच, ह्मणजे सर्व कर्माचा अनधिकार यास प्रमाण ब्रह्मपुराण.

परपूर्वा यस्य गेहे भार्या स्यात्तस्य नित्यशः ॥ आशौचं सर्वकार्येषु देहे भवति सर्वदा ॥

पुनर्विवाहित स्त्रीचे हातून भोजनादिक निषिद्ध.

यास प्रमाण.

अन्यत्र दत्ता या कन्या पुनरन्यत्र दीयते॥ तस्याश्चैव न-
भोक्तव्यं पुनर्भूः सा प्रकीर्तिता॥ बृहत् पराशरः॥

पुनर्विवाहित स्त्री पासून जाहलेली संतति पौनर्भव जातीची असून वर्णबाह्य होते.

या विषयीं प्रमाण.

या पत्या वा परित्यक्ता विधवा वा स्वयेच्छया॥ उत्पादये
त्पुनर्भूत्वा स पौनर्भव उच्यते इति मनुः॥ कात्यायनः॥
क्लीबं विहाय पतितं या पुनर्लभते पतिं॥ तस्यां पौनर्भ
वो जातो व्यक्तमुत्पादकस्य सः॥ वर्णाश्रम बहिष्ठास्ते
संकीर्ण वर्ण संभवाः॥ मातृणां च पितॄणां च त्रयाणां न
च पिंडदाः इति॥ बृहत् पराशरः॥

मिताक्षरा आचार व्यवहाराध्याय नष्टे मृते हें पराशर वचन पंडित यांस साधक होत नाहीं. या वचनांत पतिशब्द स्वामि पर्याय घ्यावा. असें सर्वज्ञ मेधातिथि व विरुद्ध वचनाची व्यवस्था करणार हेत निर्णयकार याणीं लिहिलें आहे. तसेंच हें वचन धरून याचा अर्थ सप्तपदी संस्कार होण्या पूर्वी पांच आपत्ति आल्यास तिचा दुसऱ्याशीं विवाह होतो, असा अर्थ नंद पंडित व भट्टोजी दीक्षित याणीं केला आहे तोही सयुक्तिक आहे. पतो हा प्रयोग असाधु होईल सबब आपतौ असा पदच्छेद केला म्हणजे साधु होऊन पति भिन्न पतिसदृश किंवा अल्प संस्कार युक्त पति ज्यास देण्या विषयीं वाग्दान मात्र जाहलें तो. माधवाचार्य याणीं नष्टे मृते हें वचन युगांतरपर लाविलें हेंही सयुक्तिक आहे.

औरसः क्षेत्रजश्चैव दत्तः कृत्रिम एव च॥ तथैव ह्यादशाहेन वैश्यः शुद्धिमवाप्नुयात्॥

इत्यादि वचनें युगांतरपर असून आपल्या स्मृतींत तोही धर्म सांगितला. तसाच अश्वमेधादिक तसाच या स्मृतीचा उल्लेख

युगांतर परत्वें करून केला. कारण वाक्या पेक्षां प्रकरण दुर्बल आणखींही बहुत अर्थ आहेत ते विस्तारास्तव लिहित नाहीं निषेध वाक्यें बहुत आहेत; परंतु थोडीं येथें दाखविलीं तीं :-

अद्यप्रभृतिमर्यादामयालोकेप्रतिष्ठिता॥ एकएव पतिर्नार्या यावज्जीवंपरायणं॥ मृतेजीवतिवातस्मिन्नापरंप्राप्नुयान्नरं॥ मनुः॥ नद्वितीयश्चसाध्वीनांक्वचिद्भर्तोपदिश्यते॥ नविवाहविधावुक्तंविधवावेदनंपुनः॥ नदत्वाकस्यचित्कन्यांपुनर्दद्याद्विचक्षणः॥ नतुनामापिगृण्हीयात्पत्योप्रेतेपरस्यतु॥ पाणिग्राहस्यसाध्वीस्त्रीजीवतोवामृतस्यच॥ पतिलोकानभीप्संतीनाचरेत्किंचिदप्रियम्॥

अशा अनेक स्मृति व पुराण वचनें आहेत त्याचा स्वारसिक अर्थपरित्याग करणें अन्याय आहे. इतर प्रमाणांशीं विरोध-आल्यास पराशर स्मृतीचा बाध किंवा अर्थांतर केल्याचीं उदाहरणें प्रायश्चित्ताध्याय मिताक्षरांत.

तथैवद्वादशाहेन वैश्यः शुद्धिमवाप्नुयात्

या पराशर स्मृतीचा शिष्टाचार विरोधास्तव बाध केला तसेंच

औरसःक्षेत्रजश्चैवदत्तः कृत्रिमएवच॥

असे चतुर्विध पुत्र प्रतिपादक पराशर वचनाचा संकोच.

दत्तौरसेतरेषांतुपुत्रत्वेन परिग्रहः

या वचनानें नंदपंडितानें केला त्या प्रमाणें शिष्टाचार विरोधास्तव अगर वचनांतर विरोधास्तव नष्टे मृते याचा बाध अगर अर्थांतर करणें उचित आहे. सामान्य विशेष भावानें बाध्य बाधक भाव न करितां उपपत्ति होत असून बाध करणें सर्व मीमांसक सिद्धांत विरुद्ध होतें.

वरेदेशांतरगतेत्रीनृतूनृसंप्रतीक्ष्यवै॥ कन्यान्यस्मैप्रदातव्या वाग्दानेतुकृतेसति॥ पंचत्वंचेद्वरोग

च्छेद्वाग्दानेयदिवैकृते॥ कन्यान्यस्मै प्रदातव्या तथा सप्तपदात्परम्॥ कृतेसप्तपदेभर्तुर्वियोगोयदिजायते॥ नदेयापुनरन्यस्मै कलौकन्यामनीषिभिरिति बाभ्रव्यस्मृतिः॥ मृतेजीवतिवा पत्योसंतानंदेवरादितः॥ क्रांतसप्तपदांकन्यांनोद्वहेच्च कलौद्विज इति वायुसंहितायां॥

या दोन वचनांच्या सामान्य विशेष भावानेंही उपपत्ति होत नाहीं. नारदवचन पूर्वोत्तर संदर्भानें नियोगपर पुनर्विवाहपर नाहीं. पुनर्विवाह स्वीकार केला तरी युगांतरींही श्येन यागवत्, व शय्या दानवत् विहित असतां दोष आहे या प्रमाणें मजकूर खंडक वादी यांचा आहे.

येणें प्रमाणें उभय पक्षा मध्यें वादविवाद नवबे दिवशीं पुरा जाहल्यावर सदर्हूचे प्रश्नोत्तरांचे कागद उभयपक्षांचे पंचानीं पाहून आपआपले अभिप्राय तीन दिवसांत द्यावे. आणि तीं समसमान मतें जाहल्यास सरपंच याणीं त्या पुढें दोन दिवस विचार करून आपला अभिप्राय लिहून द्यावा, अशी आज्ञा जाहली. त्या प्रमाणें दोनी पक्षांचे पंचानीं आपआपलीं मतें लिहून दिलीं त्यांतील हांशील:-

नारायणाचार्य याणीं प्रतिपादन केलेला अर्थ व शास्त्र प्रमाणें दाखविलीं तींच मान्य असून कलियुगांत पुनर्विवाहास शास्त्राधार नाहीं हेंच म्हणणें बरोबर आहे, असें म्हणणारे पंच.

५ निषेध पक्षाकडील पंच.

१ भिकुशास्त्री गोडबोले.
१ दिनकरशास्त्री खांबेटे.
१ आपाशास्त्री खाडिलकर.
१ भिकाचार्य ऐनापुरे.
१ गणेश शास्त्री कोल्हटकर

५

१. उत्तेजक पक्षाकडील पंच, व्यंकट शास्त्री माटे.

एकूण सहा पंचांचा अभिप्राय एकसारखाच आहे.

१ रावजी शास्त्री आगाशे यांचा अभिप्राय पुनर्विवाह न करण्या सारखाच आहे.

१ कृष्णशास्त्री चिपळूणकर— पुनर्विवाह विधीस सशास्त्रत्व जरी दिसतें तरी तो गौण व एकदेशीय आपत्‍ धर्म होय; व तो शेंकडों वर्षे रूढींत नाहीं हें प्रसिद्ध आहे. तो प्रचारांत आणावा किंवा न आणावा याचा विचार करण्याचें मोठें व भयंकर जोखिमाचें काम आहे. (या वरून पुनर्विवाह करण्याचें त्यांचें मत दिसत नाहीं.)

१ रघुनाथ शास्त्री शेंडे-सदर्हू प्रमाणें.

१ केशव शास्त्री गाडगीळ— सदर्हू प्रमाणेंच मत आहे. त्यांत भयंकर हा शब्द नाहीं.

येणें प्रमाणें आगाशे, चिपळुणकर, शेंडे या तिघानीं अभिप्राय देऊन मुखत्यारी संस्थानावर ठेविली आहे.

येणें प्रमाणें पंचांचे अभिप्राय आहेत; तेव्हां ठरावा प्रमाणें बहुमतानें पुनर्विवाह अशास्त्र असा वादाचा निर्णय होतो, तथापि सर पंच यांचा अभिप्राय असावा असें दिसून आल्या वरून त्यांजला अभिप्राय देण्या विषयीं आज्ञा जाहल्यावरून गोपाळाचार्य कऱ्हाडकर सर पंच याणीं अभिप्राय दिला तो:—

सात पंचांचा अभिप्राय पुनर्विवाह न करण्या विषयींचा बरोबर आहे. बाकी तीन असामी म्हणजे चिपळोणकर, शेंडे, गाडगीळ याणीं बहुधा अभिप्राय न करण्याचा दिला; परंतु कांहीं संशययुक्त लिहिणें लिहून श्रीवर भार ठेविल्या सारखें लिहिलें आहे; परंतु शास्त्राचा विचार त्याणीं पूर्ण न केला असें

वाटतें.

सभेंत असलेले सर्व विद्वज्जन मठांतील याणीं ही आपलें संमतीपत्र स्वतंत्र केलें आहे त्यांतही त्याणीं पुनर्विवाह कलियुगांत अशास्त्र आहे असाच अभिप्राय दिला आहे.

सदर्हू सभेस मंडळी होती ती.

काशिक्षेत्र.

१ शालग्राम मिश्र.
१ धुंडिराजशास्त्री धर्माधिकारी.
१ लक्ष्मीनाथशास्त्री द्रविड.

ग्वाल्हेर निसबत शिंदे सरकार.

१ रामाचार्य गजेंद्रगडकर.
१ वासुदेवाचार्य कराडकर

इंदुर निसबत होळकर सरकार.

१ गोविंदशास्त्री मांहाडकर.
१ गोविंदशास्त्री सांडे.

नाशिक.

१ सदाशिवशास्त्री जोशी.
१ नानाशास्त्री पुरोहित.

मुंबई.

१ कृष्णशास्त्री महाबळ.
१ गणेश शास्त्री मालवणकर.
१ पांडुरंग शिवराम भावे हिंदुधर्मव्यवस्थापकसभेचे कारभारी.

पुणें.

१ अण्णाशास्त्री थत्ते.
१ सदाशिव शास्त्री थत्ते.
१ बाळशास्त्री देव.
१ रामदीक्षित आपटे.
१ जनार्दनाचार्य वळे.
१ गंगाधरशास्त्री दातार.
१ भिमाचार्य कानडे.
१ कृष्णाशास्त्री राजवाडे.
१ गंगाधरशास्त्री शाहणे.
१ गोविंदशास्त्री साठे.
१ गोविंद शास्त्री मेहेंदळे.
१ नरसिंह शास्त्री शेजवलकर.
१ भावाचार्य अष्टपुत्रे.
१ धोंडशास्त्री समुद्र.
१ मोरजोशी.
१ विनायक भट रायकर
१ तात्या काशिकर.
१ पांडुरंगभट गोरे.
१ जनार्दन भट खरे.
१ अनंतभट पाळंदे.
१ बाळभट भिडे.

नगर.
१ नाना जोशी.
१ हरीशास्त्री शनी.
१ नारायणशास्त्रीअग्निहोत्री.
१ आपारावराम दाभोळकर जाहगिरदार.
१ गोविंदश्रीपत कुकडे.
१ बापु हरबाजी जोशी प्रवरासंगम.

नागपूर.
१ गजानन शास्त्री वाखरे.

भोर.
१ नारायणशास्त्री होसिंग.

वांई
१ बाळकृष्णाचार्य रड्डी
१ रामभट रानडे.
१ नारायणशास्त्री माभळेश्वरकर.
१ यज्ञेश्वरशास्त्री माभळेश्वरकर.
१ बाळाचार्य ऐनापुरे.
१ गोविंदाचार्य कानडे.

सातारा.
१ अनंताचार्य गजेंद्रगडकर.
१ वेणीमाधवाचार्य.
१ त्र्यंबकभट माटे.

माहुली.
१ नारायणशास्त्री गडबोले.

१ बाबाजी टेरे अग्निहोत्री.
१ भाऊवैद्य आठघरे.
१ आबाशास्त्री शाळग्राम.
१ बाबा कर्वे.
१ तात्या दिक्षित वामोरकर.
१ नरहरभट देवळे.
१ नाना जोशी पांवसकर.
१ बाबा माटे.
१ बाळंभट धर्माधिकारी.
१ सोनभट घोडे.
१ महादेवभट अग्निहोत्रीजुंनरकर.
१ गणोबा वैद्य अग्निहोत्री.
१ नाना जोशी वेल्हारे.
१ सखाराम निळकंठ जोशी वेल्हार
१ विठ्ठल जोशी वेल्हारे
१ सखाराम शंकर.
१ गणजोशी देडगांवकर.
१ आपाराव वैद्य.
१ गोपाळशास्त्री गोखले.
१ शंकरभट द्रविड.
१ कृष्णाराव निळकंठ मुजुमदार.
१ जिवनराव नारायण मुजुमदार.
१ निळकंठराव महादेव अंणासाहेब पुरंदरे.

कराड.

१ गुंडाचार्य घळसाशे.

१ विठ्ठल महादेव ऊर्फ विठोबा अंणा दमरदार.

सांगली.

१ हयग्रीवाचार्य आद्य

१ श्रीनिवासराव परशुराम पंत प्रतिनिधि साहेब संस्थान आऊंध.

१ चिमणाजी रघुनाथ नाना साहेब पंत सचीव संस्थान भोर.

१ लक्ष्मणराव माधव अंणासाहेब पटवर्धन संस्थान मिरजमळेकर.

१ रघुनाथराव केशव दादा साहेब पटवर्धन कुरुंदवाडकर.

१ गणपतराव हरीहर बापूसाहेब पटवर्धन कुरुंदवाडकर.

१ विनायकराव केशव आपा साहेब पटवर्धन कुरुंदवाडकर.

१ रामराव नारायण पळशीकर दिवाण निसबत होळकर सरकार.

१ रंगोविनायक अप्पासाहेब पुरंदरे.

१ सदाशिवराव बळवंत मेहेंदळे.

१ वामनराव माधवराव राइरीकर.

१ खंडेराव विश्वनाथ रास्ते.

१ त्र्यंबकराव नारायण राजमाचीकर.

१ रामचंद्र गणेश आपा साहेब नातु.

१ चिंतामणराव विश्वनाथ भाऊसाहेब नातु.

१ नारायणराव बल्लाळ नाना साहेब नातु.

१ बळवंतराव येशवंत चंद्रचूड.

१ बापूजी गोपाळ परांजपे.

१ दामोदर राव बाळकृष्ण दाभोळकर.

१ काशिनाथ विनायक लोंढे.

१ मोरो विनायक बापट.

१ सदाशिवराव बल्लाळ गोंद्ये.

१ विष्णुचिंतामण भुपटकर.

१ विश्वनाथ नारायण वैशंपायन.

१ गणेश बापुजी मराठे.

१ बाळाजी आपाजी हडप सरकर.

१ विनायक गंगाधर आबासाहेब शास्त्री पटवर्धन निसबत गायकवाड सरकार.

१ जनार्दन हरी आठले रत्नागिरी.

१ हरी देसाई राजापुरकर.

मठसंस्थान निसबत.

१ राघवाचार्य शास्त्री कालगांव.

१ रामभट म्हसकर.

१ श्रीपादशास्त्री वडेर निपाणी.

१ नागेश शास्त्री अनगोलकर.

१ हरीशास्त्री बर्वे.

१ नरसिंह पुराणीक तेरजीकर.

१ कोंडो दिक्षित अरणके कराडकर

१ सखाराम दीक्षित कराडकर.

१ सदाशिवभट केळकर.

१ श्रीपादभट पणशीकर.

१ जनार्दन भट भिलवडीकर.

१ माहादेवभट उपाध्ये संकेश्वर.

१ भवान हरी शेंडे वाळकर.

१ बाळकृष्ण गोपाळ शिरगोंदे.

१ आत्माराम रघुनाथ

१ आपाजी रामचंद्र देशपांडे कुरुंदवाडकर.

१ हरी आपाजी मुजुमदार.

१ बाबाजी रामचंद्र जामदार.

१ सखाराम केशव भिलवडीकर.

१ विष्णु गोविंद विटेकर.

१ माहादाजी रामचंद्र फडके पु.

१ त्र्यंबकपंत मोडक.

१ चिंतामणराव पांडुरंग फडके.

१ कृष्णाजी नारायण फडके.

१ गणेश भिकाजी मराठे.

१ बापु कानिटकर निसबत आबासाहेब शास्त्री

१ विठ्ठलराव कृष्ण अंणासाहेब गोळे

१ रामराव अनंत राइरीकर.

१ विष्णु रामजी रानडे.

१ सदाशिव रघुनाथ शेंडे.

१ केशव खंडो घायाळ.

१ गणेश हरी फाटक.

१ नारायणराव चिंतामण फडतरे.

१ भगवंत कृष्ण टेरे.

१ पांडुरंग सखाराम देशपांडे.

१ बापुरावजी मांडे.

१ मार्तंड रामचंद्र गोंगबले.

१ रामचंद्र चिंतामण सहस्त्रबुद्धे.

१ माहादाजी महेश्वर पाध्ये.

१ गंगाधर बाळकृष्ण ओक.

१ व्यंको बापुजी महाजन.

१ त्रिंबक रघुनाथ भावे.

१ तुकाराम हरी आत्रे.

१ काकाजी गणेश गुमास्ते पाटील बोझरकर सरदेशमुख.

१ रामचंद्र गोविंद बापट.

१ मोरो रामचंद्र गोखले चिंचवडकर.

१ गणेश काशिनाथ साठ्ये.

१ हेरंभ देव धरणीधर देव संस्थान वोझर.
१ सखाराम रामचंद्र जोशी· निसबत रावसाहेब फडणीस.
१ गणपत राव येशवंत जोग तास०
१ तात्या जोग वकील नि· जंमखिं०
१ विष्णु अनंदराव क्षीरसागर.
१ दिनकर बल्लाळ परांजपे निसबत दाभाडे सेनापती.
१ गोविंदराव केशव करंदीकर
१ विठ्ठल सखाराम अग्निहोत्री.
१ विष्णु आपाजी राशिनकर, निसबत माणकेश्वर.
१ रावजी बापूजी अनगळ.
१ विष्णु गोसावी जुन्नरकर.
१ विष्णु केशव साठे.
१ चिंतो नारायण पटवर्धन.
१ गणेश शामराव सोनटक्के.
१ गणेश हरी साठे.
१ गणेश गोविंद गडबोले.
१ गोविंद वामन दिक्षित मनोहर. इनामदार.
१ विष्णु गोपाळ रिसबूड. वकील.
१ गोविंद विश्वनाथ पटवर्धन.
१ गणेश रामचंद्र माळी·
१ गणेश वासुदेव जोशी·
१ पांडुरंग भास्कर चक्रदेव.

१ नारो भाळचंद्र नेऊरगांवकर.
१ भिकाजी अमृत माहूरराव·
१ रामराव माधव अज्याहत देशपांडे चिंचोळीकर.
१ गोविंदराव सदाशिव अज्याहत देशपांडे चिंचोळीकर.
१ गोविंद मेघःशाम टेंकणें इनाम०
१ दाजी अनंत बागाइतकर नि· अमृतराव कृष्णा देशपांडे स·
१ अनंदराव दिनकर जोशी इना०
१ दामोदर विश्वनाथ जोशी इना०
१ वामनराव पांडुरंग परांजपे नि० रास्ते.
१ बाबा गोसावी जुन्नरकर. वकील.
१ रामचंद्र धोंडदेव पटवर्धन
१ नारो जगन्नाथ गोखले.
१ विष्णु विश्वनाथ दातार.
१ वामनराव वासुदेव घारपुरे.
१ सखाराम हरी देव.
१ चिंतो सदाशिव भिडे.
१ सदाशिव नारायण कानिटकर.
१ वामन केशव भट.
१ विनायक सदाशिव थेरवडेकर
१ शिवराम कृष्णा गोखले.
१ गंगाधर गोविंद सापकर ज्ञानचक्षु वर्तमान पत्राचे कर्ते

सदरीं लिहिलेले पंच व सरपंच व वादी समक्ष हजर असले क्षेत्रो क्षेत्रींचे व देशोदेशींचे विद्वज्जन यांच्या अभिप्रायाचा विचार करून आज्ञा अशी कीं, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, या तीन वर्णांत कलियुगांत विधवेचा विवाह सर्वथैव अशास्त्र आहे; यास्तव पूर्वोक्त ज्ञातींत कोणीही पुनर्विवाह करूं नये.

पूर्वी पुणे मुक्कामींचे राहणार नारायण जगन्नाथ भिडे यांणीं विधवेशीं विवाह केल्या मुळें त्यांस पूर्वी बहिष्कृत केले आहे. व मुंबई मुक्कामीं गेले ज्येष्ठ महिन्यांत लक्ष्मी ऊर्फ वेणु विधवा इचा पांडुरंग विनायक करमरकर राहणार मौजे शिरगांव तालुके रत्नागिरी यांच्याशीं विवाह जाहला; यास्तव नारायण जगन्नाथ भिडे, व पांडुरंग विनायक करमरकर व याची विधवा स्त्री वेणु, व करमरकर यांचे विधवा विवाहास साह्य करणारे १ गोपाळराव हरी देशमुख, २ विष्णु परशुराम पंडित, ३ विष्णु मोरेश्वर भिडे, ४ श्रीकृष्णशास्त्री तळेकर, ५ विष्णु परशुराम रानडे, ६ माहादेव गोविंद रानडे, ७ जनार्दन सखाराम गाडगीळ, व विधवा वेणूचे बंधु ८ वामनराव व नारायणराव परांजपे एकूण बारा असामी यांस पूर्वी बहिष्कृत केलें आहे, तें युक्तच आहे. यास्तव यांच्याशीं व त्यांचे सांसर्गिक यांच्याशीं कोणीही संसर्ग करूं नये.

नारायण जगन्नाथ भिडे, व पांडुरंग विनायक व विधवा वेणु हे उभयतां व त्यांची संतति पतित बहिष्कृत वर्णबाह्य कधींही प्रायश्चित्तानें शुद्ध होणार नाहींत वतीं सर्व कर्मांस अनधिकारी असून स्पर्शासही योग्य नाहींत.

मुंबईत जाहलेले विधवाविवाहाचे संबंधानेंच रत्नागिरी येथें वामन आबाजी मोडक यांसही बहिष्कृत केलें आहे, तेंहीं युक्तच आहे यास्तव त्यांच्याशींही वर लिहिल्या प्रमाणेंच संसर्ग वगैरे करूं नये.

या प्रकरणीं शास्त्रार्थाचा ग्रंथ संस्कृतांत लिहून सर्वत्र

भासल्द करण्यांत येईल.

सभेंत वादविवादांचीं प्रश्नोत्तरें व पंच व सरपंच यांचीं मतें व विद्वज्जनाचें संमतीपत्र हे कागद निरनिराळे जोडले आहेत.

महानुरास
नंवरीवर्ति

शुद्धिपत्र.

| पृष्ठ | पंक्ति. | अशुद्ध. | शुद्ध. | |
|---|---|---|---|---|
| ६ | ५ | हडी | हर्डी | |
| ८ | १७ | त्यज | त्यज्य | |
| ८ | १९ | कीर्णा | कीर्णि | |



समाप्त.